


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : ११९ वा शुक्रवार दि. १३ जून २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# भारतातील १० भीषण विमान दुर्घटना, किती प्रवाशांनी गमावलेत जीव?

## महाराष्ट्रात किती झाले आहे अपघात?

**जनसंचलन/बुलढाणा**
देशातील भीषण १० विमान अपघात एअर इंडियाचे अहमदाबादहून लंडनला जाणारे प्रवासी विमान गुरुवारी सरदार पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या हद्दीबाहेर कोसळले. एआय १७१ या विमानात २००हून अधिक प्रवासी होते. अहमदाबादमध्ये घडलेला हा दुसरा मोठा अपघात आहे. यापूर्वी १९८८ मध्ये इंडियन एअरलाइन्सचे विमान कोसळले होते. त्यामध्ये १३३ जणांचा मृत्यू झाला होता. तोपर्यंतचा हा भारतातील सर्वांत भीषण अपघात होता.

**चरखी दादरी अपघात (१९९६)**
हरियाणाच्या चरखी दादरी येथे १२ नोव्हेंबर १९९६ रोजी सौदी आणि कझाकस्तानच्या विमानांची हवेतच धडक होऊन ३४९ जणांचा मृत्यू झाला. ही आजवरच्या हवाई अपघातांतील सर्वांत भीषण टक्कर मानली जाते. कझाक वैमानिकांना इंग्रजी भाषेतील सूचना न समजल्यामुळे ते १५ हजार फुटांऐवजी १४ हजार फुटांवर गेले आणि अपघात झाला.

**अरबी समुद्रातील अपघात (१९७८)**
मुंबईहून दुबईला जाणारे एअर इंडियाचे एम्पर अशोक हे विमान टेकऑफ नंतर केवळ चार मिनिटांत आणि दोन मैल अंतरावर समुद्रात कोसळले. हा अपघात एक जानेवारी १९७८ रोजी झाला. या अपघातात २१३ जणांचा मृत्यू झाला: वैमानिकांची चूक आणि उपकरणांच्या बिघाडामुळे हा अपघात झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. या अपघातानंतर वैमानिकांच्या पात्रतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते.

**मंगळुरू अपघात (२०१०)**
एअर इंडिया एक्सप्रेसचे विमान २२ मे २०१० रोजी मंगळुरू विमानतळावर उतरताना धडकेनंतर दरीत कोसळले. या अपघातात १५८ जणांचा मृत्यू झाला. मंगळुरू विमानतळाची टेबलटॉप धावपट्टी धोकादायक आहे. वैमानिकाने लँडिंगचा निर्णय वेळेवर न घेतल्याने हा अपघात झाला.

**अहमदाबाद अपघात (१९८८)**
इंडियन एअरलाइन्सचे आयसी ११३ हे विमान अहमदाबादमध्ये कोसळले. या अपघातात १३३ प्रवाशांचा मृत्यू झाला. वाईट हवामान, अपुरी दृश्यमानता आणि प्रक्रियांचे पालन न करणे ही या अपघाताची प्रमुख कारणे ठरली. ५ इम्फाळ (१९९१) इंडियन एअरलाइन्सच्या कलकत्ता-इम्फाळ-दिमापूर मार्गावर विमान अपघात झाला. इम्फाळच्या डोंगराळ भागात ही दुर्घटना घडली. त्यात ६९ प्रवाशांचा मृत्यू झाला. त्यात ६३ प्रवासी आणि सहा कर्मचाऱ्यांचा समावेश होता.

**इम्फाळ (१९९१)**
इंडियन एअरलाइन्सच्या कलकत्ता-इम्फाळ-दिमापूर मार्गावर विमान अपघात झाला. इम्फाळच्या डोंगराळ भागात ही दुर्घटना घडली. त्यात ६९ प्रवाशांचा मृत्यू झाला. त्यात ६३ प्रवासी आणि सहा कर्मचाऱ्यांचा समावेश होता.

**पाटणा अपघात (२०००)**
कोलकाता-पाटणा-लखनौ-दिल्ली मार्गावर उडत असणारे अलायन्स एअर चे विमान १७ जुलै २००० रोजी पाटण्यात कोसळले. अपघातात विमानातील



५५ प्रवासी आणि पाच जमिनीवरील लोक मृत्युमुखी पडले. ७ कोळीकोड अपघात (२०२०) सात ऑगस्ट २०२० रोजी दुबईहून वंदे भारत मोहीमेतर्गत येणारे एअर इंडिया एक्स्प्रेसचे विमान केरळमधील कोळीकोड येथे कोसळून झालेल्या दुर्घटनेत एका वैमानिकासह २० जणांचा मृत्यू झाला. टेबलटॉप धावपट्टीमुळे झालेल्या अपघातासाठी वैमानिकांच्या चुकीला जबाबदार धरण्यात आले. विमान धावपट्टीवरून घसरून ११० फूट खाली कोसळले.

**कोळीकोड अपघात (२०२०)**
सात ऑगस्ट २०२० रोजी दुबईहून वंदे भारत मोहीमेंतर्गत येणारे एअर इंडिया एक्स्प्रेसचे विमान केरळमधील कोळीकोड येथे कोसळून झालेल्या दुर्घटनेत एका वैमानिकासह २० जणांचा मृत्यू झाला. टेबलटॉप धावपट्टीमुळे झालेल्या अपघातासाठी वैमानिकांच्या चुकीला जबाबदार धरण्यात आले. विमान धावपट्टीवरून घसरून ११० फूट खाली कोसळले.

**औरंगाबाद (आताचे छत्रपती संभाजीनगर) अपघात (१९९३)**
इंडियन एअरलाइन्सचे आयसी ४९१ हे विमान औरंगाबाद येथे कोसळून ५५ जणांचा मृत्यू झाला. हे विमान धावपट्टीच्या टोकाला उचलले गेले आणि धावपट्टीपासून ४१० फूट अंतरावरील ट्रकवर आदळले, धावपट्टीपासून सुमारे तीन किलोमीटर अंतरावर हायटेन्शन विजेच्या तारांना धडकलेले विमान जमिनीवर आदळले. वैमानिकाची चूक आणि वाहतुकीचे नियमन करण्यात अधिकाऱ्यांना आलेले अपयश या दुर्घटनेसाठी जबाबदार धरण्यात आले.

**मुंबई अपघात (१९७६)**
इंडियन एअरलाइन्स चे विमान मुंबईत कोसळले. यातील सर्वच्या सर्व ९५ प्रवासी मृत्युमुखी पडले.

**बेंगळुरू अपघात (१९९०)**
इंडियन एअरलाइन्सची आयसी ६०५ हे विमान बेंगळुरूत कोसळून ९२ जणांचा मृत्यू झाला. वैमानिकांची चूक आणि संभाव्य तांत्रिक गोंधळ हे कारण मानले गेले.

## श्री संत मुक्ताबाई पालखीचे चिखलीत स्वागत
## दर्शनासाठी भाविकांची झाली होती गर्दी

**जनसंचलन/ चिखली**
श्री संत मुक्ताबाई पालखीचे ११ जून रोजी दुपारी चिखली शहरात आगमण होताच भाविकांची उत्साहात स्वागत केले. शहराच्या वेशीवर पालखीचे फटाके फोडून व टाळ-मृदंगाच्या गजरात स्वागत करण्यात आले. शहरातील नागरिकांनी आपल्या घरासमोर पालखीचे स्वागत करत दर्शन घेतले. यावेळी पावसानेही हजेरी लावून पालखीचे पुढे खामगाव-जालना महामार्गावरील सुखकर्ता




सांस्कृतिक भवन येथे आगमन झाले. या ठिकाणी नयनाप्पा बोंद्रे यांनी भक्तिभावाने श्री संत मुक्ताबाईचे पूजन केले. यानंतर स्वयंसेवकांनी वारकऱ्यांच्या पायांना आणि पाठीवर बाम लावून सेवा केली. यावेळी बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष व माजी आमदार राहुल १२ जून रोजी पालखीचे पुढील प्रवासासाठी प्रस्थान बोंद्रे यांनीही दर्शन घेतले. संध्याकाळपासून रात्री उशिरापर्यंत शहरातील दर्शनासाठी भाविकांनी रांगा लावल्या होत्या. यंदा एकूण ९०० वारकरी पालखी सोहळ्यात सहभागी झाल्याची माहिती पालखी प्रमुख रवींद्र महाराज हरणे यांनी दिली. १२ जून रोजी, गुरुवारी सकाळी श्री संत मुक्ताबाई पालखी पुढील प्रवासासाठी चिखली येथून रवाना झाली.

## बुलढाणा शहराचा वीजपुरवठा झाला खंडित...

**जनसंचलन/बुलढाणा**
शहरात गुरुवारी १२ जून रोजी दुपारी आलेल्या वादळी वाऱ्यांनी जनजीवन विस्कळीत केलं असून, संपूर्ण बुलढाणा शहर अंधारात गेलं आहे. दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास सुरू झालेल्या वादळी वाऱ्यांसह पावसामुळे वीजपुरवठा पूर्णतः खंडित झाला आहे. वादळात शहरातील विविध भागांमध्ये झाडे व वीज खांब पडल्याच्या घटना



घडल्या असून, त्यामुळे महावितरणचे वीज वाहिन्या आणि पुरवठा यंत्रणा मोठ्या प्रमाणावर बाधित झाली आहे. विशेषतः झाडे व पोल कोसळल्यामुळे दुरुस्तीला अडथळा निर्माण झाला आहे.

# ...लोकशाहीचा येळकोट...

## संपादकीय लेख

मुदत समाप्तीनंतरही तीन ते पाच वर्षे रखडलेल्या निवडणुकांसाठी प्रभाग रचना करण्याचा आदेश राज्य सरकारने काढल्याने राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका साधारणपणे ऑक्टोबरपर्यंत होतील, असे दिसते. करोनाच्या साथीमुळे या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या होत्या. त्यानंतर राज्यातील काही जिल्ह्यांत इतर मागासवर्गासाठी (ओबीसी) लागू केलेल्या आरक्षणानंतर एकूण आरक्षणाचे प्रमाण ५० टक्क्यांपेक्षा अधिक झाल्याने न्यायालयात दाद मागण्यात आली; तसेच मुंबईतील प्रभागसंख्येचा मुद्दाही न्यायालयात पोहोचला. या सुनावणीत मोठा कालापव्यय झाल्यानंतर अखेर न्यायालयाने या निवडणुका देण्याचा आदेश दिला खरा; पण याचिकांमध्ये उपस्थित करण्यात आलेले प्रश्न अजूनही कायम आहेत. विशेषत: ओबीसी आरक्षणाचा लाभ घेऊन निवडून येणाऱ्या प्रतिनिधींचे पद, हे सर्वस्वी त्या विषयावरील याचिकेच्या अंतिम निकालावर अवलंबून असल्याने आजवर इतके सव्यापसव्य का झाले, असा प्रश्न खचितच पडू शकतो. मात्र, न्यायालयाच्या ङ्गसर्वोच्चफ आदेशानुसार गेल्या पाच वर्षांतील राज्यभरातील महापालिकांमधली प्रशासकीय राजवट संपुष्टात येऊन किमान या शहरांमधील नागरिकांना लोकप्रतिनिधींमार्फत आवाज मिळेल, हेही नसे थोडके. राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयानुसार मुंबईमध्ये एक सदस्याचा प्रभाग आणि उर्वरीत सर्व महापालिकांमध्ये चार सदस्यांचा प्रभाग आखण्यात येणार आहे. चार सदस्यांच्या प्रभागांमुळे नागरिकांची कामे न होणे, सदस्यांमधील वाद अशा अनेक अडचणी आत्तापर्यंत समोर आल्या आहेत. या एका बहुसदस्यीय प्रभागात ५० ते लाखांपर्यंत मतदारसंख्या असल्याने त्यांच्यातून निवडून येणारे नगरसेवक, हे ङ्गमिनी आमदारफबनणार आहेत. या प्रचंड मोठ्या प्रभागात प्रामुख्याने पक्षीय भावनेतून मतदान होते. त्यातून प्रस्थापित राजकीय पक्षांच्या व धनाढ्य उमेदवारांना झुकते माप मिळते आणि लहान पक्ष व सर्वसामान्य उमेदवार परिघाबाहेर फ `कले जातात, हा आजवरचा अनुभव आहे. मात्र, ङ्गराजकीय सोयफया एकमेव कारणाने सत्ताधारी हीच पद्धत रेटणार, हे उघड गुपित आहे. निवडणुकीचे वेळापत्रक, प्रभागांची रचना यांवर सत्ताधारी महायुतीचा आणि त्यातही भारतीय जनता पक्षाचा वरचष्मा राहणार, हे स्पष्ट आहे. विधानसभेचे निकाल पाहता, महायुतीच्या उमेदवारीकडे बहुसंख्य इच्छुकांचा कल असणे साहजिक आहे. मात्र, याच इच्छुकांच्या प्रचंड संख्येमुळे महायुती आणि महाविकास आघाडीसुद्धा त्यांच्या त्यांच्या पातळीवर एकत्रच निवडणूक लढणार का, हा लाखमोलाचा प्रश्न आहे. युती-आघाडी झाली, तर जागावाटपाचे आव्हान असून जनसेवेसाठी आतुरलेल्या अनेकांच्या पदरी ङ्गत्यागाचे पुण्यफ येणार आहे. वर्षभरापूर्वी सत्तेत आलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कारभाराची ही परीक्षा असून, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्यासाठी हे आपापल्या



क्षेत्रांत प्रभाव टिकवण्याचे आव्हान आहे. दुसरीकडे महाविकास आघाडीमध्ये हेच अस्तित्व टिकविण्यासाठी ऐक्याचे नारे सुरू झाले आहेत. मुंबईची सत्ता टिकवण्यासाठी शिवसेना (उबाठा) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमध्ये ङ्गसाद-प्रतिसादाफ्चा खेळ रंगला आहे. मात्र, ङ्गठाकरे बंधूंनी एकत्र यावे,फ असा विचार गेल्या अनेक वर्षांपासून मांडला जात आहे, हे खरे. आता नेत्यांचा ङ्गइगोफ, कार्यकर्त्यांचा रेटा आणि व्यावहारिक शहाणपण यांतून ते कशाला प्राधान्य देतात, आणि महाविकास आघाडीचे भवितव्य काय, याचे उत्तर लवकरच मिळेल. लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकीत मतदारांचा कल बदलल्याचे उदाहरण ताजे आहेच; तसाच ङ्गपॅटर्नफ आगामी निवडणुकीत राहणार का, याची उत्सुकता आहे. या पक्षीय अभिनिवेशात गेल्या काही वर्षांत राज्यातील राजकीय वातावरण कमालीचे गढूळ आणि विखारी झाले आहे. सर्वपक्षीय नेते किमान सभ्यताही गुंडाळून ठेवून परस्परांची उणीदुणी काढण्यात मग्न असले, तरी बहुसंख्य शहरांमधील नागरिकांचा श्वास घुसमटतो आहे. बहुतांश शहरांतील रस्त्यांची दुर्दशा झाली आहे. जागोजागी होणाऱ्या वाहतुकीच्या कोंडीत त्यांचे तासनतास वाया जात आहेत. पावसाच्या एखाद्या फटक्यातच अनेक शहरांमध्ये पूरस्थिती निर्माण होते आहे. लाखो झोपडपट्टीवासी वर्षानुवर्षे नरकयातना भोगत आहेत. तेथे कोणताही पक्ष बहुमतात आला, तरी जनसामान्यांच्या प्रश्नांकडे पाठ फिरवून या स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ङ्गटक्केवारीफ्बाबत सर्वांचेच विलक्षण एकमत असते, हेही नागरिकांना कळून चुकले आहे. त्यामुळेच या पक्षीय जय-पराजयापेक्षा त्यांचे दैनंदिन जीवन सुसह्य करणारे प्रतिनिधी मिळणार का, हे त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. लोकशाहीच्या या येळकोटातून काही निदान बरे हाती लागो, अशी अपेक्षा करणे एवढेच तूर्त त्यांच्या हाती आहे!

# प्रेस सिंड्रोमने त्रस्त बालकावर जळगावात यशस्वी उपचार !

**जनसंचलन/बुलडाणा**

दुर्मिळ आणि जीवघेणा समजला जाणारा प्रेस सिंड्रोम या आजाराने त्रस्त असलेल्या सहा वर्षीय बालकावर जळगाव खान्देशच्या डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलमध्ये यशस्वी उपचार करण्यात आले. या उपचारामुळे बालकाचे प्राण वाचले असून, जिल्ह्यातील आरोग्य सेवेसाठी ही कामगिरी अत्यंत उल्लेखनीय मानली जात आहे. चोपडा येथील मुर्तुझा शेख (वय १०) याला सतत झटके, संपूर्ण शरीराला सूज, उच्च रक्तदाब, श्वासोच्छवासास अडथळा आणि शुद्ध हरपणे अशी गंभीर लक्षणे दिसून आली. त्याचबरोबर किडनीवरही गंभीर परिणाम झाल्याने बालकाला तत्काळ बालरोग अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले. बालरोग विभागाचे प्रमुख डॉ. अनंत बेंडाळे, डॉ. उमाकांत अणेकर आणि डॉ. सुयोग तन्नीरवार यांच्या नेतृत्वाखालील टीमने तातडीने तपासण्या करून प्रेस सिंड्रोमचे निदान केले. हा आजार मेंदूतील रक्तदाब



वाढल्यामुळे मेंदू सुजण्यामुळे होतो. किडनी निकामी होण्याच्या स्थितीमुळे उपचार अधिक गुंतागुंतीचे होते. औषधोपचार, अँटी-एपिलेप्टिक औषधे, रक्तदाब नियंत्रक औषधे, आणि सतत एमआरआय व तपासण्यांद्वारे उपचार करण्यात आले. आठ दिवसांत मुलाची प्रकृती स्थिर झाली. उपचारासाठी डॉ. चंदाराणी देगूलरकर, डॉ. कुशल धांडे, डॉ. निरज जगताप, डॉ. अभिजित अरमाड व परिचारिका यांनी सहकार्य केले.

# बुलढाणा शहरातील विविध भागात नाल्या तुबल्या!

**जनसंचलन/बुलडाणा**

बुलढाणा शहरातील भीमनगरसह विविध भागात नाल्यांची दुरवस्था झाली आहे. स्वच्छतेकडे नगर पालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने नाल्या तुंबल्या असून, घाण पाणी रस्त्यावर साचत आहे. गेल्या पालिका प्रशासनाचे दुर्लक्ष, नागरिकांचे आरोग्य धोक्यात आठवड्यात जिल्हा नियोजन भवनाच्या सभागृहात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत सामाजिक कार्यकर्ते कुणाल पैठणकर यांनी अनुसूचित जाती बहुल वस्त्यांमधील नाल्यांची अस्वच्छ



स्थिती, नियमित सफाई न होणे आणि कचरा व्यवस्थापनातील निष्काळजीवर ठाम आवाज उठवला होता. त्यांनी बैठकीत सांगितले की, तीन तीन महिने नाल्या साफ केल्या जात नाहीत. सफाई झालीच, तर कचरा रस्त्यावरच टाकून दिला जातो. तीच स्थिती कायम आहे

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# कोकणात आज अतिवृष्टीचा इशारा; रत्नागिरीला रेड अॅलर्ट, मुंबई-ठाणेसह राज्यात कसं असेल हवामान?

**मुंबई** : राज्यात मान्सून दाखल झाल्यानंतर १५ दिवसांहून अधिक काळ पावसाचे फारसे अस्तित्व राज्यात जाणवले नव्हते. मात्र आता मान्सूनच्या पुढील प्रवासासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होत असून राज्यातही पावसाचे प्रमाण वाढू शकते. या पार्श्वभूमीवर गुरुवारी सिंधुदुर्ग जिल्ह्याला रेड अॅलर्ट देण्यात आला होता. तर शुक्रवारी रत्नागिरीला आणि शनिवारी रायगडला रेड अॅलर्ट जारी करण्यात आला आहे. यासोबतच शनिवारी मुंबई आणि ठाणे जिल्ह्यातही ऑरेंज अॅलर्ट देण्यात आला आहे. मान्सून गुरुवारपासून पुढल ४८ तासांमध्ये विदर्भाच्या काही भागांमध्येही पोहोचण्याची शक्यता आहे. आंध्र प्रदेशच्या उत्तर किनाऱ्यापासून ओडिशापर्यंत हवेच्या वरच्या थरात चक्रीय वातस्थिती निर्माण झाली आहे. छत्तीसगड, मराठवाडा, कर्नाटकचा अंतर्गत भाग येथून कर्नाटकच्या किनाऱ्यापर्यंत चक्रीय वातस्थितीच्या वरच्या भागात ढगांची द्रोणीय स्थिती निर्माण झाली आहे. तसेच पंजाब ते आग्नेय मध्य प्रदेशपर्यंत चक्रीय वातस्थिती निर्माण झाली आहे. राजस्थानच्या आग्नेय भागापासून मध्य प्रदेशपर्यंत चक्रीय वातस्थिती आहे. याच्या एकत्रित परिणामामुळे राज्यात १७ जूनपर्यंत पाऊस सक्रिय आहे.कोकण आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी १५ जूनपर्यंत अतितीव्र मुसळधार पाऊस पडू शकतो. तर कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या काही भागात मेघगर्जना, विजा, जोरदार वाऱ्यांसह तुरळक ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता आहे, अशी माहिती प्रादेशिक हवामान विभागाने दिली.शुक्रवारी आणि शनिवारी रत्नागिरीला ङ्करेड अॅलर्टफ देण्यात आला आहे. तर त्यानंतरचे दोन दिवस रत्नागिरी जिल्ह्याला ऑरेंज अॅलर्ट देण्यात आला आहे. रायगडसाठी शुक्रवारी ङ्कऑरेंजफ तर शनिवारी ङ्करेड अॅलर्टफ आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी शुक्रवारी आणि शनिवारी ङ्कऑरेंज अॅलर्टफ तर रविवारी ङ्करेड अॅलर्टफ देण्यात आला आहे. दक्षिण कोकणासोबतच उत्तर कोकणातही पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. यामुळे



मुंबई आणि ठाणे जिल्ह्याला शनिवारी ङ्कऑरेंज अॅलर्टफ जारी करण्यात आला आहे.मुंबई आणि ठाणे जिल्ह्यात एक-दोन ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडू शकतो. शुक्रवारसाठी कोल्हापूर, कोल्हापूरचा घाट परिसर, सातारा, साताऱ्याचा घाट परिसर, सांगली येथेही पावसाचा जोर वाढू शकतो. मध्य महाराष्ट्रात सोलापूर येथे तर मराठवाडा, विदर्भात बहुतांश ठिकाणी गुरुवारी आणि शुक्रवारी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. विदर्भात सोमवारपर्यंत मेघगर्जनेसह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

## लेकाच्या भेटीसाठी लंडनची आस, सांगोला तालुक्यातील पवार दाम्पत्य अहमदाबादहून विमानाने निघाले, पण हृदयद्रावक...

**अहमदाबाद** : एअर इंडियाचे एआय १७१ हे विमान अहमदाबादहून लंडनला निघाले. मात्र, टेकऑफच्या काही मिनिटांमध्येच कोसळले. या विमानातून तब्बल २४२ लोक प्रवास करत होते. विमान क्रॅश होण्याच्या अगोदर पायलटने ला ङ्कमेडेफ्कॉल केला होता. मात्र, त्यानंतर चा विमानासोबत संपर्क होऊ शकला नाही. या विमान अपघाताची धक्कादायक फोटो आणि व्हिडीओ व्हायरल होत आहेत. अपघातानंतर लगेचच बचावकार्य राबवण्यात आले. या विमानातील एक प्रवासी जिवंत असल्याची माहिती पुढे आलीये. हेच नाही तर अपघातानंतरचा त्याचा व्हिडीओही व्हायरल झालाय. विमानाने दुपारी १ वाजून ३८ मिनिटांनी उड्डाण घेतले. मात्र, पुढील ५ ते ६ मिनिटात हे विमान कोसळले. ज्यावेळी हे विमान कोसळले, त्यावेळी मोठा स्फोट देखील झाला. आता एक मोठी माहिती पुढे आलीये. अहमदाबादहून लंडनला जाणाऱ्या विमानात सांगोला तालुक्यातील हातीद गावातील महादेव पवार आणि आशा पवार हे देखील




होते. दोघेजण आपल्या लेकाकडे लंडनला निघाले होते. त्यांचा मुलगा लंडनमध्ये असल्याने हे दोघे लेकाच्या भेटीसाठी जात होते.या विमान अपघातानंतरचे अनेक फोटो आणि व्हिडीओ पाहून भीषणता लक्षात येतंय. हे विमान मेडिकल कॉलेजच्या हॉस्टेलवर पडले. यावेळी हा विमान अपघात झाला, त्यावेळी विद्यार्थी जेवण करत होते. एअर इंडियाचे विमान बी. जे. मेडिकल कॉलेजच्या हॉस्टेलवर कोसळल्याने काही विद्यार्थी गंभीर जखमी तर काहींचा मृत्यू झाल्याचीही माहिती आहे. अहमदाबाद विमानतळावरून दुपारी १:३९ वाजता रनवे २३ वरून या विमानाने उड्डाण केले. उड्डाण केल्यानंतर अवघ्या ३५ सेकंदामध्ये हा अपघात झाल्याची माहिती मिळत आहे. विमानात तांत्रिक बिघाड झाल्याने हा अपघात झाला आहे. पायलटने मेडे कॉल देखील केला होता. मात्र, लँडिंगच्या अगोदरच विमानाचा अपघात झाला. अमित शहा हे देखील अहमदाबादमध्ये पोहोचले असून त्यांनी घटनास्थळाची पाहणी केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या घटनेबद्दल दु:ख व्यक्त करत सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली

## कारला वाचवण्यासाठी करकचून ब्रेक, ट्रेलरमधील सळ्या केबिनमध्ये घुसल्या...

**पुणे** : पुण्यात अवजड वाहनांकडून होणाऱ्या अपघातांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गंगाधाम चौकामध्ये नुकतेच ट्रकने उडवल्यामुळे एका महिलेचा मृत्यू झाला होता. त्यानंतर पुण्यात अवजड वाहनांकडून होणाऱ्या अपघातांचा मुद्दा चर्चेत असतानाच आता चांदणी चौकामध्ये एका ट्रेलरचा भीषण अपघात झाला आहे. अर्टिगा कारला वाचवण्याच्या प्रयत्नात करकचून ब्रेक दाबल्यामुळे सळ्या केबिनमध्ये घुसून झालेल्या अपघातात ट्रेलर चालक आणि साथीदाराला प्राण गमवावे लागले. मुंबईकडून बंगळूरूकडे जाणाऱ्या मार्गावर गुरुवारी रात्री आठ ते नऊच्या सुमारास हा भीषण अपघात झाला आहे.लोखंडी सळ्या आणि पाईप वाहतूक करणारा हा ट्रेलर चांदणी चौकाच्या अलिकडे महामार्गाच्या सुरु असलेल्या रस्त्याच्या कामाजवळ पोहोचला. इतक्यात एक अर्टिगा कार त्याला आडवी आली. अर्टिगा चालकाने या ट्रेलरसमोर येऊन आपलं वाहन विरुद्ध दिशेला वळवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे या ट्रेलर चालकाने अर्टिगाला वाचवण्यासाठी जोरात ब्रेक दाबला. हा धक्का इतका जोरात होता की त्या ट्रेलरमध्ये असणाऱ्या सळ्या आणि



पाईप या थेट ड्रायव्हरच्या केबिनमध्ये घुसल्या. यातच चालकाचा आणि त्याच्या साथीदाराचा मृत्यू झाला. हा ट्रेलर मूळचा राजस्थानचा असून ट्रेलर चालक हाच याचा मालक असल्याची माहिती आहे.या अपघातानंतर पोलीस, अग्निशामक दल, जेसीबी आणि क्रेनच्या सहाय्याने ट्रेलर चालकाला बाहेर काढण्याचा प्रयत्न केला गेला. मात्र सळ्या या केबिनमध्ये घुसल्यामुळे बचाव कार्य करण्यासाठी अडचणी येत होत्या. यंत्रणांनी चालकाला आणि त्याच्या साथीदाराला वाचवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. सुरुवातीला अर्धा तास चालकाच्या हालचाली जाणवत होत्या मात्र अर्ध्या तासाने त्या मंदावल्या आणि चालकाने प्राण सोडले. ज्या अर्टिगा चालकामुळे हा अपघात झाला तो जागेवरून निघून गेला. याबाबत हिंजवडी पोलीस अधिक तपास करत आहेत.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# करिश्मा कपूरच्या नवऱ्याचे निधन, लव्ह मॅरेज की अरेंज? मुलं झाल्यावर का आली नात्यात दरी...

**मुंबई-** २००२ मध्ये बॉलिवूडची सुपरहिट अभिनेत्री करिश्मा कपूर आणि अभिषेक बच्चन यांच्या साखरपुड्याची घोषणा करण्यात आली होती. ही घोषणा अमिताभ बच्चन यांच्या ६० व्या वाढदिवशी करण्यात आली होती. पण २००३ मध्ये करिश्माने अभिषेक बच्चनसोबतचा तिचा साखरपुडा तोडला. काही महिन्यांनंतर, करिश्मा कपूरने अचानक एका प्रसिद्ध उद्योगपती संजय कपूरशी लग्न केले. अभिषेक बच्चनसोबतचा तिचा साखरपुडा मोडल्यानंतर, करिश्मा त्या नात्यातून पुढे सरकली. मीडिया रिपोर्ट्सनुसार, करिश्मा कपूरचे संजय कपूरसोबतचे लग्न अरेंज्ड मॅरेज होते. करिश्मा कपूर ही संजय कपूरची दुसरी पत्नी होती. संजयचा आधीच एकदा घटस्फोट झाला होता. पण २९ सप्टेंबर २००३ रोजी करिश्मा आणि संजय कपूर यांनी लग्न केले. करिश्माच्या लग्नाची मीडिया आणि



बॉलिवूडमध्ये अनेक दिवस चर्चा होती. कपूर कुटुंबाने हे लग्न मोठ्या थाटामाटात लावून दिले होते.२००५ मध्ये संजय कपूर आणि करिश्मा कपूर यांनी मुलगी समायराला जन्म दिला. २०१० मध्ये मुलगा कियानचा जन्म झाला. मुलांच्या येण्याने त्यांचे कुटुंब पूर्ण झाले होते. पण हळूहळू त्यांच्या नात्यात दरी येऊ लागली.करिश्मा कपूर आणि संजय कपूर यांनी २०१४ मध्ये घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला. २०१६ मध्ये त्यांचा घटस्फोट झाला. ते वेगळे झाले. पण घटस्फोटापूर्वी दोघांनीही एकमेकांवर अनेक आरोप झाले. संजय करिश्मा कपूरला कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देऊ इच्छित नव्हता. तसेच, त्याने आरोप केला की करिश्माने पैशासाठी त्याच्याशी लग्न केले. करिश्माने मात्र या गोष्टी कधीच मान्य केल्या नाही. घटस्फोटानंतर करिश्माने संजय कपूरबद्दल अनेक गोष्टी शेअर केल्या. करिश्मा म्हणाली की, संजय त्याच्या आईसोबत मिळून तिला खूप त्रास देत असे. अभिनेत्रीने मारहाणीबद्दलही खुलासा केला.संजयने करिश्माला घटस्फोट दिल्यानंतर लवकरच तिसरे लग्न केले. करिश्मा कपूरशी घटस्फोट घेतल्यानंतर संजयने प्रिया सचदेवशी लग्न केले. संजय कपूरशी घटस्फोट झाल्यानंतर करिश्मा पुन्हा अभिनयात सक्रिय झाली. अलिकडेच ती काही रिॲलिटी शोचे जज करतानाही दिसली. ती तिच्या दोन मुलांसह मुंबईत राहते. आता संजय कपूरच्या वयाच्या ५३ व्या वर्षी निधनाची बातमी समोर आली आहे. पोलो गेम खेळताना अचानक त्याला हार्ट अटॅक आला.

# पहिल्याच टीम मीटिंगमध्ये गंभीरकडून विराट आणि रोहितच्या नावाचा उल्लेख; कारण ऐकून तुम्हालाही आनंद होईल...

**इंग्लंड:** २०जूनपासून इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेपूर्वी टीम इंडियाने आपल्या नवीन पर्वाला सुरुवात केली आहे. भारतीय संघ सध्या बेकेनहॅममध्ये सराव करत आहे, जिथे सर्व खेळाडू इंग्लंडच्या आव्हानासाठी स्वतःला तयार करत आहेत. विराट कोहली, रोहित शर्मा आणि आर. अश्विन सारख्या दिग्गजांच्या निवृत्तीनंतर भारत पहिल्यांदाच तरुण संघासोबत कसोटी खेळणार आहे. या नवीन जबाबदारीसह, संघाचे प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी पहिल्या संघ बैठकीत खेळाडूंना संबोधित करताना उत्साह आणि आत्मविश्वासाने भरले. यावेळी त्यांनी विराट, रोहित आणि अश्विन यांचाही उल्लेख केला. गंभीरने आपल्या भावनिक आणि प्रेरणादायी भाषणात सांगितले की, ङ्कङ्कहा संघ पहिल्यांदाच आपल्या तीन सर्वात अनुभवी खेळाडूंशिवाय खेळणार आहे, परंतु हे आव्हान नाही तर तरुण खेळाडूंसाठी सुवर्णसंधी आहे. त्याने खेळाडूंना आठवण करून दिली की देशासाठी खेळणे ही सर्वात मोठी प्रेरणा आणि अभिमानाची बाब आहे. इंग्लंडची ही मालिका त्यांना इतिहास रचण्याची संधी देत आहे. त्याने संघात दिसणाऱ्या विजयाच्या उत्कटतेची आणि भूकेची प्रशंसा केली. आपल्याला प्रत्येक चेंडू, प्रत्येक सत्र आणि प्रत्येक तासाला लढावे लागेल, तरच आपण इंग्लंडच्या या दौऱ्यावर इतिहास



रचू शकू.ङ्कङ्क्या कसोटी मालिकेसाठी अनेक तरुण खेळाडूंनाही संधी देण्यात आली आहे. पहिल्याच बैठकीत गंभीरने नवीन खेळाडूंचे मनापासून स्वागत केले. त्याने प्रथम साई सुदर्शनच्या नावाचे कौतुक केले आणि म्हणाला, ङ्कङ्कपहिल्यांदाच कसोटी संघात निवड होणे हा एक अतिशय खास क्षण आहे.

गेल्या तीन महिन्यांत साईने फलंदाजीने दाखवलेली कामगिरी कौतुकास्पद आहे. मला आत्मविश्वास आहे की अर्शदीप लाल चेंडूच्या क्रिकेटमध्येही चमत्कार करू शकतो. गंभीरने करुण नायरच्या पुनरागमनाला खूप खास म्हटले. तो म्हणाला, पुनरागमन करणे कधीच सोपे नसते, परंतु सात वर्षांनंतरही नायरने हार मानली नाही आणि त्याचे शेवटचे वर्ष उत्तम राहिले आहे. त्याचा दृष्टिकोन संपूर्ण संघासाठी प्रेरणादायी आहे. कर्णधारपद मिळाल्याबद्दल शुभमन गिलचे अभिनंदन. भारतीय संघाचा कर्णधार म्हणून निवड होणे ही स्वतःमध्ये खूप अभिमानाची गोष्ट आहे. उपकर्णधार असलेल्या ऋषभ पंतचेही संघाच्या नेतृत्व गटात स्वागत आहे. इंग्लंड कसोटी मालिकेसाठी टीम इंडियाचा संघ कर्णधार: शुभमन गिल उपकर्णधार आणि यष्टिरक्षक: ऋषभ पंत इतर खेळाडू: यशस्वी जयस्वाल, केएल राहुल, साई सुदर्शन, अभिमन्यू ईश्वरन, करुण नायर, नितीश रेड्डी, रवींद्र जडेजा, ध्रुव जुरेल (यष्टिरक्षक), वॉशिंग्टन सुंदर, शार्दुल ठाकूर, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा, आकाश दीप, अर्शदीप सिंग, कुलदीप यादव



## खामगाव तालुक्यात मुसळधार पाऊस

**खामगाव:** बुलढाणा शहराप्रमाणेच खामगाव शहर व तालुक्यात मुसळधार पावसाने ठिकठिकाणी हजेरी लावली. या दरम्यान झाड कोसळून एक म्हैस गंभीर झाल्याची घटना खामगाव तालुक्यातील भालेगाव बाजार येथे घडली.

खामगाव तालुक्यातील हजारो शेतकरी व सर्वसामान्य नागरिक पावसाची आतुरतेने वाट पाहात होते. आज गुरुवारी मुसळधार पावसाने खामगाव शहरासह परिसराला चांगलेच झोडपून काढले. सोसाट्याच्या वाऱ्यासहीत झालेल्या या पावसाने वाहनधारक, पादचारी रस्त्यावरील किरकोळ साहित्य विक्रेते यांची चांगलीच तारांबळ उडाली.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मराठवाड्याला पावसाचा फटका! ४० दिवसांत ३८ जणांचा मृत्यू

## ५१ जखमी, १७००० हेक्टरवरील पिकांचं नुकसान...



**छत्रपती संभाजीनगर :** गेल्या ४० दिवसांत पडलेल्या अवकाळी पावसामुळे मराठवाड्यातील १७ हजार हेक्टर क्षेत्रावरील पिकांसह फळपिकांना मोठा फटका बसला आहे. यात बीड, नांदेड, लातूर जिल्ह्यांना सर्वाधिक फटका बसला आहे. नुकसानीचे पंचनामे तातडीने करून भरपाई देण्यात यावी, अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांकडून होत आहे. दरम्यान, याच कालावधीत नैसर्गिक आपत्तीमुळे ३८ जणांचा मृत्यू झाला असून ५१ जण जखमी झाले आहे, अशी माहिती विभागीय आयुक्तालयाच्या सूत्रांनी दिली. एकीकडे पाणी टंचाईची भीषण परिस्थिती असतानाच विभागात सहा मेपासून अवकाळी पावसाने हजेरी लावली. वादळी वाऱ्यासह पडलेल्या या अवकाळी पावसामुळे जिरायती पिकासह बागायत क्षेत्र व फळपिकांना मोठा फटका बसला. सहा मे ते आतापर्यंत पडलेल्या पावसामुळे एक हजार २२७गावांमधील १७ हजार ६४४ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. यामध्ये १० हजार २२७ हेक्टरमधील बागायती, ५६५ हेक्टरमधील जिरायत क्षेत्रातील तर सहा हजार ८५१ हेक्टर क्षेत्रावरील फळपिकांचे नुकसान झाले, अशी माहिती विभागीय आयुक्तालयातील सूत्रांकडून सांगण्यात आले.यात मे महिन्यात १२ हजार ७१२ हेक्टर क्षेत्रावरील पिके बाधित झाले. यात एक हजार ९७५ हेक्टर फळपिकाचे नुकसान झाले. दहा हजार १७६ हेक्टवरील बागायती क्षेत्र बाधित झाले असून, ५५९ जिरायत क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले आहे. जून महिन्यात हिंगोली व नांदेड जिल्ह्यातील पिकांना फटका बसला. या दोन्ही जिल्ह्यांत आतापर्यंत चार हजार ८७५ हेक्टरवरील फळपिकांचे, ५१ हेक्टरवरील बागायतीचे तर जिरायती क्षेत्रातील ५.८२ हेक्टरवरील पिके बाधित झालेत. दरम्यान, वीज कोसळल्याच्या घटने, त्याचप्रमाणे भिंत पडून अशा विविध घटनांमध्ये मे ते १० जूनपर्यंत ३८ जणांचा मृत्यू झाला आहे. यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पाच जणांचा मृत्यू झाला. जालना सात, परभणी, हिंगोली प्रत्येकी दोन, बीड पाच, लातूर सहा, धाराशिव आणि नांदेड जिल्ह्यात १० जणांचा मृत्यू झाला तर विभागात एकूण ५१ जण जखमी झाले आहेत. दरम्यान, याच कालवधीत विभागातील ६१३ पशुधन दगावले आहे. यामध्ये १५५ लहान दुभती तर ३०१ मोठी दुभती जनावरे दगावली आहेत. त्याचप्रमाणे ३१ लहान व १२६ मोठे ओढकाम करणारे पशुधन दगावले आहे. छत्रपती संभाजीनगर शहरातही बुधवारी जोरदार वादळी वाऱ्यासह पाऊस झाला आहे

# स्कूटर ते कार, विजय रुपाणींनी लकी नंबर मिरवला, नियतीने तोच शेवटचा दिवस ठरवला...




**अहमदाबाद :** गुजरातमधील अहमदाबादमध्ये गुरुवारी दुपारी सरदार वल्लभभाई पटेल विमानतळावरुन लंडनला जाण्यासाठी निघालेल्या एअर इंडियाच्या विमानाला भीषण अपघात झाला. या अपघातात २४१ प्रवासी आणि क्रू मेंबर होते. यात एक प्रवासी सुदैवाने वाचला असून इतर सर्वांचा मृत्यू झाला आहे. त्याशिवाय ज्या इमारतीवर विमान कोसळलं, त्या मेडिकल हॉस्टेल अर्थात वसतिगृहातील २४ जणांचाही यात मृत्यू झाला आहे. अहमदाबाद - लंडन याच विमानात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी हेदेखील प्रवास करत होते. त्यांचाही विमान दुर्घटनेत मृत्यू झाला असल्याचं समोर आलं आहे. त्यांच्या निधनानंतर तसंच या अपघातानंतर संपूर्ण देशात हळहळ व्यक्त होत आहे. गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांच्या निधनानंतर त्यांच्या आयुष्याशी संबंधित एक घटना आणि त्यांच्या मृत्यूच्या तारखेचा योगायोग समोर आला आहे. गुजरातमधील मीडियाने याबाबत माहिती शेअर केली आहे.विजय रुपाणी १२०६ हा त्यांचा लकी नंबर असल्याचं सांगायचे. त्यांच्या पहिल्या स्कूटरच्या नंबरप्लेटचा क्रमांक १२०६ होता. आजही ही स्कूटर त्यांच्याकडे आहे. या पहिल्या स्कूटरनंतर त्यांनी अनेक कार, इतर स्कूटर, वाहनं घेतली. त्या सर्व कार आणि इतर वाहनांवरही त्यांनी १२०६ हाच नंबर आपला गाडी क्रमांक म्हणून घेतला.अहमदाबाद - लंडन विमानाचा ज्या दिवशी अपघात झाला, तो दिवस, अपघाताची तारीख १२ जून २०२५ अशी होती. याच एअर इंडिया विमानाच्या अपघातात विजय रुपाणी यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूची तारीखही त्यांनी मानलेला लकी नंबर अर्थात १२-०६ हीच निघाली. १२ जून रोजी झालेल्या अपघाताची तारीखच त्यांच्या लकी नंबरशी १२०६ शी जुळली.गुजरातमधील मीडियाकडून ही बाब शेअर करण्यात आल्यानंतर सोशल मीडियावर या घटनेबाबत आश्चर्य व्यक्त केलं जात आहे. सोशल मीडियावर युजर्सनी कमेंट करत त्यांची विमानातील बसण्याची सीटदेखील १२ नंबरची असल्याचं म्हटलं आहेदरम्यान, विमान वसतिगृहातील इमारतीवर कोसळल्यानंतर विमानातील प्रवासी आणि कर्मचाऱ्यांसह जिथे विमान कोसळलं तेथील २४ जणांचा मृत्यू झाला आहे. अशा एकूण मिळून २६५ जणांना या विमान दुर्घटनेत आपला जीव गमवावा लागला आहे. इतकंच नाही, तर वसतिगृहावर विमान कोसळून तेथील लोकांच्या मृत्यूशिवाय इतर आजूबाजूला असलेल्या परिसरातील, रस्त्यावरुन जाणाऱ्या काही लोकांचाही मृत्यू झाल्याचं सोशल मीडियावर बोललं जात आहे.

# घटनेनंतर अभिनेता सलमान खानचा मोठा निर्णय, म्हणाला देश दु:खात असताना आम्ही...



**मुंबई:** अहमदाबाद विमान दुर्घटनेमुळे देश सुन्न झालायं. या घटनेत मोठी जीवितहानी झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. या घटनेचं गांभीर्य लक्षात घेता सिनेइंडस्ट्रीतल्या कलाकारांनाही आता त्यांचे नियोजित कार्यक्रम रद्द केले आहेत. एअर इंडिया विमान दुर्घटनेची माहिती मिळताच बॉलिवूड अभिनेता सलमान खाननं त्याचा एक नियोजित कार्यक्रम रद्द केला आहे. गुरुवारी अहमदाबाद विमानतळावर एक दु:खद घटना घडली. एअर इंडियाचं विमान टेक ऑफ झाल्यानंतर काहीच वेळात क्रॅश झालं. या घटनेचा बॉलिवूड कलाकारांनाही मोठा धक्का बसलाय. अनेक बॉलिवूड कलाकारांनी या घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. अभिनेता सलमान खान एका कार्यक्रमात सहभागी होणार होता. पण, त्यानं हा कार्यक्रम रद्द करण्याचा निर्णय घेतला. तो इंडियन सुपरक्रॉस रेसिंग लीगच्या लॉन्चिंग कार्यक्रमात सहभागी होणार होता. मात्र, विमान अपघातामुळं त्यानं हा कार्यक्रम पुढं ढकलण्याचा निर्णय घेतला. कार्यक्रमाच्या आयोजकांनी याबद्दल माहिती दिली. ते म्हणाले, देशात आज एक दु:खद घटना घडली आहे. हे आपल्या सर्वांसाठीच दु:खाचे क्षण आहेत. आणि सलमान खान या कठीण समयी देशासोबत आहेत. त्यामुळं आम्ही हा कार्यक्रम पुढं ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. कारण, हा सेलिब्रेशनची वेळ नाहीए. या दु:खाच्या क्षणी आम्ही पीडित कुटुंबांसोबत आहोत आणि त्यांच्यासाठी प्रार्थना करत आहोत. अहमदाबादमधील विमान अपघातानं बॉलिवूड कलाकारही हादरलं आहेत. अक्षय कुमारनं सोशल मीडियावर पोस्ट करून आपलं दु:ख व्यक्त केलं. तो म्हणाला, ङ्खएअर इंडियाच्या दुर्घटनेनं खूप मोठा धक्का बसला आहे. मी सुन्न झाला आहे. या क्षणी फक्त प्रार्थना करू शकतो. सनी देओलनं ही या घटनेबद्दल दु:ख व्यक्त केलं. त्यानं लिहिलं, अहमदाबादमध्ये झालेल्या विमान अपघाताची बातमी ऐकून खूप दु:ख झालं. मी अजूनही धक्क्यात आहे. या कठीण काळात मी सर्वांसाठी मनापासून प्रार्थना करतो.

# कोल्हापुरात ढगफुटीसदृश्य पाऊस, ओढे-नाले तुडुंब

## अनेक घरात पाणी शिरलं, जनजीवन विस्कळीत, शेतीचंही नुकसान...



**कोल्हापूर :** शहरासह जिल्ह्याला पावसाने अक्षरशः झोडपलं आहे. गुरुवारी सायंकाळच्या सुमारास विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाने लावलेल्या जोरदार हजेरीमुळे शाळा आणि ऑफिसमधून घरी जाणाऱ्या विद्यार्थी, नागरिकांना मोठी कसरत करावी लागली. शहरातील अनेक सखल भागात गुडघाभर पाणी साचल्यामुळे तसंच अनेक आस्थापनात आणि घरांमध्ये पाणी शिरल्याने जनजीवन विस्कळीत झालं आहे. तर पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावर अनेक ठिकाणी पावसाचे पाणी आल्याने वाहतूक मंदावली. दुसरीकडे गोकुळ शिरगाव आणि सरनोबतवाडी येथे दोघेजण ओढ्याच्या पाण्यात वाहून गेले असून यातील एकाला आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून रिस्क्यू करण्यात यश आलंय, तर अन्य एकाचा शोध सुरू आहे. तब्बल १५ दिवसांच्या विश्रांतीनंतर पावसाने पुन्हा आपली बॅटिंग सुरू केली आहे. भारतीय हवामान विभागाने गुरुवारी कोल्हापूरसह राज्यातील अनेक जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला होता. सकाळी झालेल्या पावसाच्या हलक्या सरीनंतर वातावरणात काहीसा उष्मा जाणवत होता. मात्र सायंकाळच्या सुमारास अचानक सुरू झालेल्या मेघगर्जनेसह तुफान पावसाने कोल्हापूरचे रस्ते जलमय झाले होते. सुमारे तासभर पडलेल्या ढगफुटीसदृश्य पावसामुळे जिल्ह्यातील ग्रामीण भागासह कोल्हापूर शहरात सर्वत्र पाणीच-पाणी पाहायला मिळालं. शहराच्या सखल भागात राजारामपुरी, दुधाळी परिसर, सरनाईक वसाहत, परीख पूल, पाचगाव सह अनेक भागातील घरांमध्ये पाणी शिरल्याने आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडून या ठिकाणी अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं. काही इमारतींच्या बेसमेंटमध्ये पाणी शिरल्याने भर पावसात नागरिकांना आपली वाहनं इतरत्र सुरक्षित हलवावी लागली. तर शहरातील काही भागात विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला. कोल्हापूर शहरातील राजारामपुरी परिसरातील बागेतील टाकी देखील वाहून गेली असून अनेक खेळणी तुटली. ऐन ऑफिस सुटायच्या वेळेत मुसळधार पावसाचं पाणी रस्त्यावर आल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाल्याचं दिसून आलं. दरम्यान वाहतूक शाखेच्या पोलिसांनी ऐन पावसात आपली जबाबदारी पार पाडत वाहतूक सुरळीत केली. पहिल्याच पावसाने कोल्हापुरला जलमय केलंय.पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावरील गोकुळ शिरगाव येथील ओढ्यावर पाणी आल्यामुळे राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक काहीशी मंदावली होती. याच ठिकाणी ओढ्याचं पाणी पाहण्यासाठी गेलेल्या तरुणाचा तोल जाऊन तो ओढ्याच्या पाण्यात वाहून जात असताना गोकुळ शिरगाव येथील स्थानिक रहिवाशांनी दोरीच्या साहाय्याने त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला. मात्र हातातून दोरी सटकल्यामुळे पुन्हा तो ओढ्याच्या पाण्यात वाहू गेला, यानंतर तरुणाने पुढे जाऊन झाडाला पकडलं आणि स्थानिक तरुणांनी त्याला पाण्यातून बाहेर काढत रेस्क्यू केलं. तर कोल्हापूर शहराजवळ सरनोबतवाडी येथेही शाळकरी मुलगा सायकलवरून जात असताना पावसाच्या पाण्यात सायकल घातल्याने, पाण्याला प्रवाह जास्त असल्याने सायकलवरून तो वाहून गेला असून जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाचं बचाव पथ या मुलाचा शोध घेत आहेत. आठवडाभरापूर्वी पडलेल्या पूर्व पावसामुळे मशागत झाली नसल्याने शेतकरी बांधव अडचणी सापडले होते, यानंतर पावसाने आठ दिवस उघडीप दिली. शेतीतील मशागती पूर्ण झाल्या. काही शेतकऱ्यांनी पेरणीही केली होती. मात्र ढगफुटी सदृश्य पावसामुळे पेरणी झालेल्या शेतामध्ये गुडघाभर पाणी साचून राहिल्याने पेरणी केलेल्या शेताचं मोठं नुकसान झालं आहे.

# रोहित शर्माच्या जागी श्रेयस नाही तर कोण होणार वनडे कॅप्टन, बीसीसीआय कोणाला करणार कर्णधार...




**मुंबई :** रोहित शर्माला वनडे क्रिकेटमधून निवृत्त करायचचं, असा चंग कोणीतरी बांधलाय असे वाटत आहे. कारण सध्या वनडे क्रिकेट खेळले जात नसताना रोहितच्या निवृत्तीची मात्र जोरदार चर्चा सुरु आहे. रोहितच्या जागी श्रेयस अय्यर भारताचा वनडेमध्ये कर्णधार होईल, असे वाटत होते. पण आता रोहितच्या जागी श्रेयस नाही तर कोणाच्या नावाची बीसीसीआयमध्ये आता चर्चा सुरु झाली आहे, हे समोर आले आहे. रोहित शर्माने काही दिवसांपूर्वीच कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. आता रोहित शर्मा भारतासाठी फक्त वनडे क्रिकेटच खेळू शकतो. रोहित शर्मा वनडे वर्ल्ड कप खेळून निवृत्ती घेईल, असे म्हटले जात होते. पण वनडे वर्ल्ड कप मात्र २०२७ साली होणार आहे. तोपर्यंत रोहित शर्मा ४० वर्षांचा होईल. पण रोहितचा फिटनेस पाहता तो अजून दोन वर्षे खेळू शकेल की नाही, याबाबत काही जणांनी शंका उपस्थित केली आहे. त्यामुळे रोहित जर वर्ल्डकप खेळणार नसेल तर त्याने आत्ताच निवृत्ती घ्यावी, असा दबाव त्याच्यावर टाकला जात आहे. बीसीसीआयने तर रोहितच्या जागी कोणाला कर्णधार करायचे, याचे नावही ठरवले आहे.चॅम्पियन्स ट्रॉफीच्या विजयानंतर रोहित शर्मा आपली वनडे क्रिकेटमधील निवृत्ती जाहीर करेल, असे बीसीसीआयला वाटत होते. कारण टी २० वर्ल्ड कप जिंकल्यावर त्याने निवृत्ती जाहीर केली होती. पण चॅम्पियन्स ट्रॉफी विजयानंतर मात्र रोहितने निवृत्ती जाहीर केली नाही, त्यामुळे आता त्याच्यावर वनडे क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याचा दबाव आणला जात आहे. वनडे क्रिकेटमध्ये श्रेयस अय्यर सातत्यपूर्ण चांगली कामगिरी करत आहे, त्यामुळे रोहितनंतर श्रेयस अय्यर कर्णधार होईल, असे सर्वांना वाटत होते. पण आता श्रेयस नाही तर शुभमन गिलला वनडे संघाचे कर्णधारपद देणार असल्याचे बीसीसीआयने जवळपास निश्चित केले आहे. त्यामुळे रोहितने कर्णधारपद सोडले की, आता शुभमन गिलला भारताचा पुढचा कर्णधाक बनवणार असल्याचे ठरवण्यात आले आहे. त्यामुळे आता रोहित शर्माने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यावर गिलला कसोटी संघाचा कर्णधार केले होते. त्याचप्रमाणे रोहितने वनडे क्रिकेटमधून निवृत्ती पत्करली की, तिथेही रोहितचीच वर्णी लागवण्यात येणार असल्याचे आता बीसीसीआयने ठरवले आहे. रोहित शर्मावर आता वनडे क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याचा दबाव आणला जात आहे. त्यामुळे रोहित शर्मा आता हे सर्व प्रकरण नेमकं कसं हाताळतो, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असणार आहे.

# बळीराजा कसा जगतोस रे बाबा!

## एचटीबीटी कपाशी बियाण्यांची अवैध विक्री!कृषी विभागाने केला एकावर गुन्हा दाखल, ५९ पाकिटे जप्त!

**जनसंचलन/बुलढाणा**

दुष्काळग्रस्त जिल्ह्यात आसमानी व सुलतानी संकट शेतकऱ्यांसमोर दत्त म्हणून उभे आहे. अशात लांबलेल्या खरीप हंगामासाठी सरसावलेल्या शेतकऱ्यांची काहीशी आशा पल्लवीत झाल्याने आता कुठे बियाणे, खते व कीटकनाशके घेण्यासाठी कृषी केंद्रावर गर्दी होत आहे.परंतु वरूण राजाची हुलकावणी आणि शेतकऱ्यांचा पेरणीसाठी झालेला भ्रमनिरास अशी स्थिती असताना, काही जण शेतकऱ्यांना बोगस बियाणे देवून फसवणूक करीत असल्याचा प्रकार घडत आहे.११ जून रोजी जळगाव जामोद येथे अवैध एचटीबीटी कापूस बियाणे विक्री करणाऱ्याला पकडून त्याच्याविरुद्ध विविध गुन्हे दाखल करण्यात आले आहे. जळगाव जामोद येथे अवैध व अनधिकृत एचटीबीटी कापूस बियाणे विक्री करणाऱ्या एका इसमावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, गणेशआप्पासाहेब सावंत यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, जळगाव जामोद येथील आचल नगर येथे एक इसम आपल्या घरात अनाधिकृत हे बियाणे विक्री करत होता. जिल्हा निरीक्षक कृषी अधिकारी बुलढाणा यांच्या मान्यतेने सापळा रचण्यात आला. दोन पंच, सुनील पवार (तालुका कृषी अधिकारी खामगाव) आणि धनंजय देवकर (लिपिक), तसेच प्रमोद गायके (मोहीम अधिकारी), रमेश जाधव (तालुका कृषी अधिकारी जळगाव जामोद), आणि कृष्णा भगत (कृषी पर्यवेक्षक) यांच्यासह गणेश सावंत हे आचल नगर, जळगाव जामोद येथे दुपारी ४:०० वाजता पोहोचले. तिथे अशोक रामभाऊ रंदाळे (वय ३९, व्यवसाय सेल्समन, रा. आचल नगर जळगाव जामोद) नावाचा इसम आपल्या घरात अनाधिकृत बियाणे विक्री करताना मिळून आला. चौकशी केली असता, अशोक रंदाळे याच्याकडे बियाणे विक्रीचा कोणताही परवाना नसल्याचे समोर आले. त्याने हे बियाणे सुनगाव येथील सुखकर्ता कृषी केंद्रातून आणल्याचे सांगितले. त्याच्या घराची झडती घेतली असता, खालीलप्रमाणे अनधिकृत बियाणे पाकिटे जप्त करण्यात आली. करण्यात आली असून, यापैकी कोणत्याही पाकिटावर उत्पादक, प्रक्रियाकर्ता किंवा विक्रेता यांचा उल्लेख नव्हता. ही पाकिटे शासनाने अनाधिकृत केलेली असून, त्यांच्या विक्रीद्वारे शासनाची आणि शेतकऱ्यांची फसवणूक केली जात होती. जप्त केलेल्या पाकिटांमधून प्रत्येकी दोन पाकिटांमधील प्रत्येकी तीन नमुने प्रयोगशाळा तपासणीसाठी सीलबंद करण्यात आले आहेत. या प्रकरणी, अशोक रामभाऊ रंदाळे



यांच्यावर भारतीय न्याय संहिता () २०२३ च्या कलम ३१८(४), ३३६(४), ३४०(२) अंतर्गत, बियाणे नियम १९६८ च्या कलम ७, ८, ९, १०, ११, १२, १३, १४, ३८ अंतर्गत, बियाणे (नियंत्रण) आदेश १९८३ च्या खंड ३, ९ अंतर्गत, बीज अधिनियम च्या कलम ७(), ७(), ७() अंतर्गत, पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ च्या कलम ७, १५, १६ अंतर्गत, अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ च्या कलम ३, ७, ९ अंतर्गत, आणि वजन व मापे पॅकेज केलेल्या वस्तू नियम १९७७ च्या कलम ६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाराष्ट्र कापूस बियाणे २००९ कलम १२ (९) आणि कापूस बियाणे किंमत नियंत्रण अधिनियम आदेश २०१५ कलम ५ हे देखील लागू आहेत.सदरची कार्यवाही प्रमोद लहाळे (विभागीय कृषी सहसंचालक, अमरावती), मनोजकुमार ढगे (जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, बुलढाणा) आणि बाळासाहेब व्यवहारे उपविभागीय कृषी अधिकारी, खामगाव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# पालिका निवडणूक; तयारीला वेग

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील ११ नगरपरिषद निवडणुकांसाठी निवडणूक प्रक्रिया मार्गी लावण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने टप्प्याटप्प्याचे नियोजन आखले असून, त्यानुसार प्रभाग रचना, हरकती-सूचना, सुनावण्या आणि अंतिम अहवाल सादरीकरणासाठी वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. जिल्ह्यातील ११ पालिकांची नव्याने प्रभाग रचना करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाने ११ जून रोजी दिले होते; परंतू त्याचा कालबद्ध कार्यक्रम जाहीर केला नव्हता. १२ जून रोजी जाहीर झालेल्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने आता प्रशासन कामाला लागले आहे. सध्या जिल्ह्यातील ११ पालिकांच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. निवडणूक कार्यक्रम राबवण्याच्या दिशेने प्रशासन सज्ज झाले असून, नगर विकास विभागाने त्यासंदर्भातील कार्यक्रमच दिला आहे. यामध्ये ११ जून ते १६ जून प्रगणक गटाची मांडणी, १७ जून ते ३० जून पर्यंत प्रारुप प्रभाग रचना तयार करणे, ४ ते ८ जुलै दरम्यान प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव राज्य निवणूक आयोगाकडे पाठविणे, १५ जुलै ते २१ जुलै दरम्यान प्रारुप प्रभाग रचना प्रसिद्ध करून त्यावर हरकती मागणे, त्यानंतर जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने प्राप्त हरकती व सुचनांवर सुनावणी घेण्यात येईल.






# दोन गटांत हाणामारी; १४ जणांवर परस्पर गुन्हे



**जनसंचलन/ डोणगाव**

आंध्रुड गावात मंगळवारी (दि. ११ जून) सकाळी दोन गटांत वादातून तुंबळ हाणामारी झाली. या घटनेत दोन्ही बाजूने सात-सात जणांविरोधात परस्पर विरोधी तक्रारीवरून गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. जिवे मारण्याचा प्रयत्न, मारहाण, धमकी, घातपाताचा कट आणि सार्वजनिक शांततेचा भंग या गंभीर स्वरूपाच्या आरोपांखाली गुन्हे नोंदवले आहेत. पंजाबराव देशमुख आणि मंगेश बनसोडे यांच्या गटामध्ये हा वाद झाला. जुना वाद या घटनेस कारणीभूत असल्याचे सांगण्यात येत आहे

# बुलढाण्यात माजी नगराध्यक्षांच्या घरासमोर भयानकच घडलं!

**जनसंचलन/बुलढाणा**

शहरात आज संध्याकाळी आकाश काळवंडले आणि अवघे शहर वादळवाऱ्याने थरथर कापू लागले! जोरदार पावसाबरोबरच विजांचा कडकडाट सुरू असतानाच जनता चौकात मोठा अनर्थ टळला. माजी नगरसेवक तथा नगराध्यक्षपती मोहम्मद सज्जाद यांच्या घरासमोर असलेले जुने झाड अचानक भरवाऱ्यात उन्मळून पडले आणि एका पार्क केलेल्या वाहनावर कोसळले. ही घटना इतकी भीषण होती की काही क्षणासाठी परिसरात एकच घबराट उडाली. सुदैवाने



वाहनात कोणीही नसल्यामुळे मोठी जीवितहानी टळली. झाडाजवळच प्रसिद्ध वकील ॲड. जावेद यांचे कार्यालयही आहे, त्यामुळे मोठा अनर्थ घडण्याची शक्यता होती.

# योगाच्या सामर्थ्याने जागतिक आरोग्य आणि शांततेच्या दिशेने भारताचे नेतृत्व....!

## केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी केली आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्य केली कार्यक्रमांची घोषणा ...!!

**जनसंचलन/बुलढाणा**

योगाच्या सामार्थ्याने जागतिक आरोग्य आणि शांततेच्या दिशेने भारताचे नेतृत्व अधिक सक्षम होत असल्याचे प्रतिपादन केंद्रीय आयुष मंत्री (स्वतंत्र प्रभार) प्रतापराव जाधव यांनी आज ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिन () २०२५ च्या कर्टेन रेज़र ( ) कार्यक्रमात केले. केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रीय मीडिया केंद्र येथे प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी, मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी आणि निमंत्रित पाहुण्यांनाच्या समक्ष कर्टे न रेज़र ( ) हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव बोलत होते. यावर्षीचा आंतरराष्ट्रीय योग दिन विशेष महत्त्वाचा आहे, असे सांगून श्री जाधव म्हणाले, हे वर्ष जागतिक उपक्रमाच्या यशस्वी दशकपूर्तीचे प्रतीक आहे. यावर्षीची संकल्पना एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग अशी आहे. याबाबतची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ३० मार्च रोजी मन की बात कार्यक्रमात केली होती, अशी माहिती श्री जाधव यांनी यावेळी दिली. ही संकल्पना केवळ वैयक्तिक आरोग्यापुरती मर्यादित नसून, जागतिक समन्वय आणि शांततेसाठी योगाची क्षमता अधोरेखित करते, असे श्री जाधव यांनी यावेळी म्हणाले. यावर्षी दि. २१ जून २०२५ रोजी मुख्य कार्यक्रम आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथे पार पडणार असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी योग प्रदर्शनाचे नेतृत्व करणार आहेत. आंध्र प्रदेश सरकारने दहा लाख




नियमित योग साधकांचे नेटवर्क उभे करण्याचे निश्चित केले असल्याची श्री जाधव यांनी यावेळी सांगितले आंतरराष्ट्रीय योग दिन २०२५ अंतर्गत आयुष मंत्रालयाने १० महत्वपूर्ण उपक्रम प्रोत्साहित केले आहेत यात योग बंधनः १० देशांसोबत भागीदारीत संयुक्त कार्यक्रम , योग कनेक्टः जागतिक योग परिषद, हरित योगः पर्यावरण संतुलनासाठी वृक्षारोपण मोहिम, योग अनप्लग्डः तरुणाईसाठी प्रेरणादायी उपक्रम, योग समावेशः दिव्यांग आणि विशेष गटांसाठी योगाचे समावेशक कार्यक्रम, योग प्रभावः योगाचे सामाजिक परिणाम मोजणारा अभ्यास, योग महाकुंभ, संयोग व योग पार्क्सः एकत्रित सहभागासाठी १,००० योग उद्यानांची योजना असे लोकोपयोगी तसेच प्रेरणादायी उपक्रम हाती घेतले असल्याचे श्री जाधव यांनी यावेळी सांगितले. योग दिनाच्या पूर्वसंध्येला नाशिकसह दिल्ली, भुवनेश्वर, व पुदुचेरीसारख्या ठिकाणीही अनेक काउंटडाउन कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत. ज्यामध्ये नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. श्री जाधव यांनी यावेळी प्रसारमाध्यमांना आवाहन केले की त्यांनी यावर्षीच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाला ऐतिहासिक व प्रेरणादायी बनवण्यासाठी सरकारला साथ द्यावी. त्यांनी नमूद केले की, योग ही केवळ शारीरिक क्रिया नसून, तो शिस्त, संयम आणि सकारात्मकतेचा संदेश देणारी जीवनशैली आहे. कार्यक्रमाच्या शेवटी श्री जाधव यांनी आशा व्यक्त केली की, सर्वांच्या सहभागातून आंतरराष्ट्रीय योग दिन २०२५ हा एक केवळ कार्यक्रम न राहता एक जागतिक जनआंदोलन बनेल, जे लोकांना आयुष्यभर योग अंगीकारण्याची प्रेरणा देईल. असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला

# तूफानी पावसाने बुलढाण्याला झोडपले!

## विजांच्या कडकडाटाने उरात धडकी!



**जनसंचलन/बुलढाणा**

वातावरणात अचानक बदल होऊन आज सायंकाळी साडेचार च्या सुमारास तुफानी पावसाने बुलढाण्याला झोडपून काढले. धुव्वादार पावसात विजांच्या कडकडाटाने नागरीकांच्या उरात धडकी भरवली होती. जिल्ह्यात १५ जून नंतरच मोसमी पाऊस पूर्णपणे सक्रिय होण्याची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली होती. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या करण्याची घाई करू नये, असे आवाहन कृषि विभागाने देखील केले.तर काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह, मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली होती.त्याप्रमाणे आज जिल्ह्यात विजेच्या गडगडाटासह साडेचार वाजता वादळी पाऊस झाला.पावसा सोबतच वाऱ्याचा जोर ऐवढा होता की, जिल्ह्यातील काही भागात टिनपत्रे उडाली. वृक्ष उन्मळून पडले. विद्युत तारा लोंबकळून विद्युत प्रवाह बंद झाला होता.या वादळी पावसामूळे काही वेळ जनजिवन विस्कळीत झाले होते. पावसामुळे बरेच नुकसान झाले असून, अधिकृत माहिती प्राप्त झालेली नाही.






# वाहनाच्या धडकेत बिबट्या हा जागीच झाला ठार...

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हयात जंगल व्याप्त परीसर असल्याने अलीकडे बिबट्यांची संख्या वाढत आहे.मात्र बिबट अन्न पाण्याच्या शोधार्थ मानवी वस्तीकडे किंवा रस्त्यांवर येत असल्याने त्यांच्यासह मानवी जिवाला धोका निर्माण झालाय. अशातच खामगाव तहसील अंतर्गत खामगाव-चिखली मार्गावर एका बिबट्याला वाहनाची धडक बसल्याने बिबट जागीच ठार झाला. ही घटना गणेशपूर जवळ गुरुवारी रात्री १ वाजताच्या सुमारास घडली. गणेशपूर परिसराला घनदाट जंगलाचा वेढा आहे. या परिसरात वन्य प्राणी नेहमीच आढळून येतात. नेहमीप्रमाणे रस्ता



ओलांडताना एका अज्ञात वाहनाने बिबट्याला धडक दिली.धडकेमुळे बिबट्याचा मृत्यू झाला. पहाटे ५:३० वाजता गस्त घालत असताना हिवरखेड पोलिसांच्या कर्मचाऱ्यांना घटनेची माहिती मिळाली. हिवरखेड पोलिस ठाण्याचे कर्मचारी तात्काळ घटनास्थळी पोहोचले. त्यांनी तत्काळ वन विभागाला माहिती दिली. काही वेळातच वन विभागाचे अधिकारी चेतन राठोड आणि कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. त्यांनी घटनास्थळाची पाहणी केली आणि पंचनामा केला. त्यानंतर, तो खामगाव येथील वन विभाग कार्यालयात नेण्यात आला आणि त्याचे पशुवैद्यकीय रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८